**राज्यातील त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा संरचनेचे मूल्यमापन करुन त्याबाबत शासनास आवश्यक ती उपाययोजना सूचविण्यासाठी तज्ञ समिती गठीत करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: जिमस ०९१७/प्र.क्र.२०८ /२-स,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ मार्च, २०१८.

वाचा : १) शासन निर्णय,समक्रमांक दिनांक ६.११.२०१७

२) शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक प्रवास १०१०/प्रक्र२/सेवा-५, दि.३.३.२०१०

३) शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक बैठक २०१२/प्रक्र१/सेवा-५, दि.२४.५.२०१२

**प्रस्तावना : -**

राज्यातील त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा संरचनेचे मूल्यमापन करुन त्याबाबत शासनास आवश्यक ती उपाययोजना सूचविण्यासाठी तज्ञ समिती उपरोक्त वाचा क्र.१ येथील शासन निर्णय दि. ६.११.२०१७ अन्वये गठीत करण्यात आली आहे. उपरोक्त वाचा क्र. २ व ३ मध्ये अनुक्रमे अशासकीय सदस्यांसाठी प्रवास भत्ता व बैठक भत्ता देण्याची तरतूद आहे. सदर समितीतील बहुतांश सदस्य हे अशासकीय सदस्य आहेत. अशा सदस्यांना प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देणेबाबत मुद्या शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय : -**

१. शासन निर्णय वित्त विभाग, दि.३.३.२०१० मधील परिच्छेद १२ मधील तरतूदीनुसार उपरोक्त तज्ञ समितीतील अशासकीय सदस्य (त्यांनी त्याची प्रतीपूर्ती इतर कोणत्याही मार्गाने केली नसल्यास) प्रवास भत्त्यासाठी पात्र असतील.

२ तसेच वाचा क्र. ३ येथील शासन निर्णय वित्त विभाग, दि.२४.२.२०१२ नुसार राज्यातील असांविधिक समित्या/आयोग /मंडळे यावर नियुक्त अशासकीय सदस्यांच्या बैठक भत्ता या समितीतील अध्यक्ष व सर्व सदस्यांना अनुज्ञेय असेल.

३. सदर बाबीसाठी होणारा खर्च मागणी क्रमांक व्ही-२, २४२५-सहकार, ००१ संचालन व प्रशासन, (०१) संचालन व प्रशासन,(०१)(०१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था (अनिवार्य) (२४२५ ००११) लेखाशिर्षाखालील या संबंधित बाबीसाठी मंजूर अनुदानातून भागविता यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३१३१६४०५६०६०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramesh Shankarrao Shingte

Digitally signed by Ramesh Shankarrao Shingte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co- Operation, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fed1b2ed6e1e4aca719170d9eae8aa251ee28dc56c75d8a65acb34103d45bd48, cn=Ramesh Shankarrao Shingte
Date: 2018.03.13 16:42:14 +05'30'

( रमेश शिंगटे )
**अवर सचिव तथा सहनिबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) श्री.यशवंत थोरात (माजी अध्यक्ष, नाबार्ड बँक)
३) डॉ. विजय झाडे, सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था, पुणे
४) श्री. राजेंद्र एन.कुलकर्णी, चीफ जनरल मॅनेजर, नाबार्ड, पुणे
५) श्री विद्याधर अनासकर, सदस्य, प्रशासकीय मंडळ, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या.,मुंबई
६) श्री प्रतापराव चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, कोल्हापूर
७) श्री दिनेश ओऊळकर, सेवानिवृत्त पणन संचालक, पुणे
८) श्री.डी.ए.चौगुले, सनदी लेखापाल तथा सेवानिवृत्त सहनिबंधक,सहकारी संस्था (लेखा परिक्षण).
९) अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, मुख्यालय, पुणे
१०) महालेखापाल-१, (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा) महाराष्ट्र- १, मुंबई
११) महालेखापाल-२, (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा) महाराष्ट्र- २, नागपूर
१२) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).
१३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / पुणे
१४) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई / पुणे
१५) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१६) निवड नस्ती.